www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक- श्री. अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 2 बुधवार दि. 10 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

# दैनिक युवक आधारचा दुसरा वर्धापन दिन

## पत्रकारांना मार्गदर्शन आणि गुणवंतांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** स्थानिक तसेच राज्यभरात अल्पावधीतच वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या दैनिक युवक आधार या वृत्तपत्राचा दुसरा वर्धापन दिन सोहळा पनवेलमध्ये मोठ्या उत्साहात आणि भव्यतेने पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून न्यूज 18 लोकमत चे सहसंपादक व ख्यातनाम अँकर विलास बडे, साम टीव्ही चे मुख्य संपादक निलेश खरे, तसेच मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री माधवी जुवेकर उपस्थित होते. उद्योगपती सुधीर कटेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सोहळ्याचे उद्घाटन झाले.

**पत्रकारांना दिलेले मार्गदर्शन**

उद्घाटनप्रसंगी बोलताना *विलास बडे* म्हणाले की, पत्रकारितेने समाजाचे प्रश्न पाठीच्या कणाप्रमाणे उभे राहून मांडले पाहिजेत. सत्य व समाजहिताला प्राधान्य दिल्यास वाचकांचा विश्वास नक्कीच जिंकता येतो. दैनिक युवक आधारने हे कार्य अल्पावधीत साध्य केले आहे. *निलेश खरे* यांनी म्हटले की, पत्रकारितेचे खरे ध्येय म्हणजे स्थानिक प्रश्नांना न्याय देणे, सर्वसामान्यांच्या अडचणी मांडणे आणि सकारात्मक घटनांना वाचा फोडणे. युवक आधार हे ... ध्येय यशस्वीपणे साध्य ... करत आहे. *माधवी जुवेकर* यांनी सांगितले की, ... पत्रकारिता आणि कलाक्षेत्र या दोन्हींचा समाजावर परिणाम होतो. युवक आधारने सत्याचा मार्ग स्वीकारून सामाजिक बदल घडविण्यासाठी महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. *गुणवंतांचा राज्यस्तरीय व राष्ट्रीय गौरव* या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला.

***राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त***

प्रशांत गांगर्डे – क्रीडा रत्न पुरस्कार, धीरज चावला – वास्तू रत्न पुरस्कार, सज्जन गायकर – उद्योग रत्न पुरस्कार, श्रीकांत नवले – राजकीय दीप रत्न पुरस्कार, अनिल भाऊ इरले – कामगार रत्न पुरस्कार, हरीश आंधळे – समाज रत्न पुरस्कार, नारायण वावीया – शिल्परत्न पुरस्कार, समीर शेख – शिवसंदेश रत्न पुरस्कार, अविनाश कदम – सेवा रत्न पुरस्कार, सौ. व श्री. कल्पना पांडुरंग काळे – अन्नदाता पुरस्कार, शिवाजी थोरवे – समाजसेवक रत्न पुरस्कार, मयूर मोहिते – समाजभूषण पुरस्कार, संतोष रामसेज पांडे – उद्योजक रत्न पुरस्कार, डॉ. सोनाली आमले – आरोग्य रक्षक पुरस्कार, साक्षी सागवेकर – समाज रत्न पुरस्कार, रमेश राऊत – युवक आधार रत्न पुरस्कार, करण धोंगडे – युवक आधार रत्न पुरस्कार, विशाल सावंत – उत्कृष्ट इव्हेंट मॅनेजमेंट रत्न पुरस्कार, गजानन पवार – युवक आधार रत्न पुरस्कार, ह.भ.प. श्री. बापू ढगे महाराज – समाज सुधारक रत्न पुरस्कार, हर्षिता खांडेकर – उत्कृष्ट बाल शाहीर रत्न पुरस्कार, अर्जुनी सस्ते – उत्कृष्ट बालकलाकार रत्न पुरस्कार, अंबादास पाटील – युवा उद्योजक रत्न पुरस्कार, डॉ. अपर्णा गायकवाड – आरोग्य सेवा पुरस्कार, कैलास नेमाडे – जीवन रक्षक रत्न पुरस्कार, केवळ महाडिक – प्रेरणादायी व लेखणी रत्न पुरस्कार, विकास क्षत्रिय – युवक आधार रत्न पुरस्कार, राहुल कुलकर्णी – युवक आधार रत्न पुरस्कार, योगेश पालोदकर – युवक आधार रत्न पुरस्कार, सूर्यकांत गिरमाजी इरबा – युवक आधार रत्न पुरस्कार, आदित्य संतोष गोंधळी – पनवेल पहिला पायलट रत्न पुरस्कार, कपिल पाटील – युवक आधार रत्न पुरस्कार, नीता माळी – समाजसेविका रत्न पुरस्कार, किशोर गुडेकर – युवक आधार रत्न पुरस्कार
नितीन लोखंडे – युवक आधार रत्न पुरस्कार, जयवंत बाबरे – समाजसेवक रत्न पुरस्कार, शिवानी सतीश राव माने देशमुख – आदर्श मुख्याध्यापिका रत्न पुरस्कार
डॉक्टर. गणेश वाकचौरे – आरोग्य रक्षक रत्न पुरस्कार, *राष्ट्रीय पुरस्कार*, अजित म्हामुणकर – राष्ट्रीय संघटक रत्न पुरस्कार, *विशेष पुरस्कार*, प्रवीण सावंत – महाराष्ट्र समाज रत्न पुरस्कार, सर्व पुरस्कारप्राप्तांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले., *सांस्कृतिक कार्यक्रम*, लोकप्रिय गायक राज कांबळे यांनी आपल्या सुरेल गाण्यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले आणि कार्यक्रमाला रंगत आणली., *कैलास पाटील यांचे विशेष कार्य*, कार्यक्रमाला उपस्थित राहिलेले जवळजवळ प्रतिनिधी पत्रकार इतर पाहुणे 300 च्या आसपास उपस्थित होते या या सर्वांसाठी अल्प आहाराची सोय केली होती., *दोन वर्षांचा प्रवास आणि पुढील वाटचाल*, कार्यक्रमाच्या शेवटी दैनिक युवक आधारच्या दोन वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा आढावा घेण्यात आला. संपादक संतोष शिवदास आमले यांनी "युवक आधार टीम समाजहितासाठी सदैव कार्यरत राहील" असा निर्धार व्यक्त केला.

**कार्यक्रम यशस्वी करणारे कार्यकर्ते** या सोहळ्याच्या यशात संपादकीय टीम अजय कापरे, मुकुंद कांबळे, जगन्नाथ रासवे, विलास गायकवाड, प्रदीप पाटील, विजय दुंद्रेकर, एम.डी. भोईर, राजू शिंदे, मच्छिंद्र पाटील, जगदीश क्षीरसागर, अनुराग आमले, शंतनु भालेराव, आदित्य शेटे, आर्यन शेटे, राहुल माने, कैलास नेमाडे, प्रसाद हनुमंते, कैलास रक्ताटे, विशाल सावंत आदींचा मोलाचा सहभाग होता. दैनिक युवक आधारचा दुसरा वर्धापन दिन हा केवळ उत्सव न ठरता, पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि गुणवंतांचा गौरव यांचा संगम ठरला. या सोहळ्यामुळे युवक आधारची वाटचाल अधिक प्रेरणादायी व प्रभावी ठरणार आहे, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.










# पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खड्ड्यांविरोधात मनसे 'खड्डेमय यात्रा'

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी

*आज सकाळी साडेदहा वाजता आंदोलनाची सुरुवात* पनवेल, 10 सप्टेंबर २०२५ : पनवेल शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असून, खड्ड्यांमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) पनवेल महानगरपालिका प्रशासनाच्या निष्क्रियतेकडे लक्ष वेधण्यासाठी 'खड्डेमय यात्रा' आंदोलन करणार आहे. हे आंदोलन मनसे पनवेल महानगर अध्यक्ष तथा राज्य प्रवक्ता श्री. योगेश चिले यांच्या नेतृत्वाखाली पार पडणार असून, त्याची टॅगलाइन आहे - 'यावंच लागतंय, खड्ड्यात पडावच लागतंय'. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवर खड्ड्यांची संख्या वाढत असल्याने वाहनधारकांना अपघातांचा धोका वाढला आहे. गेल्या वर्षीही मनसेने हॅंडीकॅप आंदोलन करून रस्ते दुरुस्तीसाठी आणि नवीन रस्त्यांसाठी निधीची मागणी केली होती. त्या वेळी प्रशासनाने खर्च करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु परिस्थिती जैसे थे. आता पुन्हा एकदा खड्ड्यांविरोधात मनसे सैनिक रस्त्यावर उतरणार आहेत. या आंदोलनाद्वारे पालिका प्रशासनाला झोपेच्या खेळातून जागे करण्याचा प्रयत्न असून, रस्त्यांचा लवकरात लवकर विकास व्हावा यासाठी नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.आंदोलनाची सुरुवात आज सकाळी साडेदहा वाजता पनवेल महानगरपालिका कार्यालयापासून होणार असून, शहरातील प्रमुख खड्डेमय रस्त्यांची 'सफारी' काढली जाईल. मनसे पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, या आंदोलनात सहभागी होऊन नागरिकांनी प्रशासनावर दबाव आणावा, जेणेकरून पनवेलचे रस्ते सुरक्षित आणि सुव्यवस्थित होऊ शकतील. या आंदोलनामुळे पालिका प्रशासनाला रस्ते दुरुस्तीचे काम तात्काळ हाती घ्यावे लागेल, अशी अपेक्षा आहे. मनसेने यापूर्वीही पनवेल आणि नवी मुंबईतील खड्ड्यांविरोधात अनेक आंदोलने केली आहेत. उदाहरणार्थ, सायन-पनवेल महामार्गावरील खड्ड्यांमुळे झालेल्या अपघातांविरोधात मनसेने पदयात्रा काढली होती. या पार्श्वभूमीवर आजचे आंदोलन महत्त्वाचे ठरणार आहे.

# देगलूर तालुक्यात स्मार्ट मीटर बसवू नयेत अशी शिवसेनेची मागणी

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर



नांदेड - देगलूर देगलूर शहरात गेल्या काही महिन्यांपासून वीज बिलाच्या तक्रारी वाढल्या असून दुरुस्तीच्या नावाखाली महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट यांच्यावतीने आंदोलन छेडण्यात आले. शहरातील नागरिकांनी चार महिन्यांपूर्वी महावितरणकडे मीटर जपिंग व हजारो रुपयांचे बिल येत असल्याबाबत तक्रारी केल्या होत्या. मात्र त्यावर तोडगा न काढता,आता दुरुस्तीच्या नावाखाली स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. याला शिवसेनेने तीव्र विरोध दर्शविला. शिवसेना पदाधिकाऱ्यांनी महावितरणचे उपमुख्य कार्यकारी अभियंता श्री. चाटे यांना निवेदन देऊन देगलूर शहर व तालुक्यात स्मार्ट मीटर बसवू देणार नाही. जर महावितरणने हट्ट धरला तर शिवसेनेतर्फे आमरण उपोषण, रास्ता रोको आणि मीटर फोडो आंदोलन उभारले जाईल,असा इशारा दिला. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुखे निधन महेश पाटील, शहरप्रमुख संजय जोशी, शहरप्रमुख रवी उल्लेवार, सोशल नेटवर्किंग तालुकाप्रमुख भागवत पाटील सोमूरकर, मषणाजी पैलावार, बाबुराव मिनकीकर, विनोद सोनकांबळे, संतोष कांबळे, नागेश गुडलावार यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक व नागरिक उपस्थित होते.

# माजी नगरसेवक शिवाजी थोरवे हे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

दैनिक युवक आधार
खांदा कॉलनी

खांदा कॉलनीतील माजी नगरसेवक, शिवसेनेचे शहर प्रमुख, सामाजिक कार्यकर्ते श्री *शिवाजी साहेबराव थोरवे* साहेबांना *समाज भूषण* हा *राज्यस्तरीय* पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सकाळ समूहाचे मुख्य संपादक निलेश खरे साहेब सहसंपादक विलास बडे साहेब (लोकमत आयबीएन)यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला




गेली 21 वर्ष शिवाजी थोरवे साहेब सामाजिक क्षेत्रात काम करत आहेत दरवर्षी ते शालेय विद्यार्थ्यांसाठी लागणारे दाखले चे शिबीर घेऊन त्यांना मोफत दाखले देण्याचे काम करत आहेत त्याचबरोबर विधवा महिलांना पेन्शन चालू करणे ज्येष्ठ नागरिकांसाठी दाखले शाळेचे R T E च्या माध्यमातून गरीब विद्यार्थ्यांचे मोफत ऍडमिशन, तसेच खांदा कॉलणी त प्रत्येक सोसायटीत सर्वे करून अपंगांसाठी पेन्शन चालू करून दिली त्याचबरोबर जे नोकरीतून रिटायर झाले आहेत त्यांचा यथायोग्य सत्कार असे सामाजिक बांधिलकीतून त्याने कामे केली आहेत. त्याचबरोबर खांदा कॉलनी त पोलीस स्टेशन असावं म्हणुन केलेला पत्र व्यवहार, पोस्ट ऑफिस, रेल्वे क्रॉसिग वरती खांदा कॉलनी ते नवीन पनवेल ओव्हर ब्रिज सिग्नल यंत्रणा अशा अनेक कामाचा त्यांनी पाठपुरावा करून ती कामे करून घेतली त्यांच्या कामाची दखल घेऊन दैनिक युवक आधार च्या दुसऱ्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून श्री शिवाजी थोरवे साहेबांना हा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला

## पुरुष स्वाभिमानी फाउंडेशन तर्फे पत्नी पीडित पुरुषांचा महामेळावा

**दैनिक युवक आधार**
**, रमेश राऊत कल्याण ग्रामिण प्रतिनिधी**



दि.१०, उल्हासनगर :१३ सप्टेंबर २०२५ दुसरा शनिवार रोजी पत्नी पीडितांचा महामेळावा उल्हासनगर-४, कल्याण येथे होणार आहे.हा मेळावा सकाळी ८.३० ते संध्याकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत राहणार आहे.या मेळाव्यात खोट्या ४९८अ,DV Act,घटस्फोट, कस्टडी अशा प्रकरणांमध्ये पुरुषांना न्याय मिळवून देण्यासाठी जागृती,कायदेशीर मार्गदर्शन,समुपदेशन व सामाजिक एकता.पुरुष हक्कांसाठी कायदेशीर व सामाजिक लढ्याची दिशा अशा विविध प्रश्नावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मेळावा हा एकदिवशीय असेल तरी मेळाव्यास येताना मेळाव्याच्या दिवशी सकाळपर्यंत पोहचावे,सदरच्या मेळाव्यात आपण आपल्या आई-वडिलांना आणि केस मध्ये ज्यांची नावे आहेत त्यांना देखील आणू शकतात.आई-वडिल किंवा केस मध्ये ज्यांची नावे आहेत यांना सोडून इतर बाहेरच्या व्यक्तींना जसे की कोणी राजकारणी,समाजसेवक,वकील,मित्र, मैत्रीण आणि इतर बाहेरील व्यक्तींना सदरच्या मेळाव्यात प्रवेश नाही यांची सर्व सदस्यांनी नोंद घ्यावी.सदरचा मेळावा हा फक्त पत्नी पीडित पुरुषांसाठी आहे.तरी सदरच्या मेळाव्यात ज्यांना ज्यांना सहभागी व्हायचे आहे,त्यांनी आपले बुकिंग करणे गरजेचे आहे.जेणेकरून संपूर्ण व्यवस्था करणे सोपे जाईल. लवकरात लवकर मेळाव्याचे बुकिंग करावे,वेळेवर कोणाचेही बुकिंग घेतले जाणार नाही दि.१० सप्टेंबर २०२५ नोंदणीची शेवटची तारीख आहे.वेळेवर वाढीव व्यक्तींचे नियोजन होत नसल्यामुळे त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाही.तरी या मेळाव्यात जास्तीत जास्त नागरीकांनी सहभागी व्हावे,असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.श्री.संकेत दाभाडे 9422395223 (नाशिक),तुषार भोसले 7709587699 (नाशिक)तुषार चौधरी 9970728367 (उल्हासनगर),रोहित नागवंशी 8888859633 (पुणे),कवी बालाजी 9284468710 (संभाजी नगर),संजय पवार 8983071758 (धुळे).

# आदर्श विद्यामंदिर माजी विद्यार्थी संघटना प्रभानवल्ली,खोरनिनको आयोजित

## भव्य अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेत ओंकार इलेव्हन हरळ ठरला विजेता

दैनिक युवक आधार लांजा:- (प्रमोद तरळ)

आदर्श विद्यामंदिर माजी विध्यार्थी संघटना प्रभानवल्ली-खोरनिनको आयोजित भव्य अंडर आर्म क्रिकेट स्पर्धा गुरुवार दिनांक २७ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्सवात पार पाडली. स्पर्धेमध्ये एकूण २२ संघांनी सहभाग घेतला होता.संघटनेचे हे १७ वे वर्ष होते. स्पर्धेचे उदघाटन प्रशालेच्या मुख्याध्यपिका सौ.अनिता शिंदे मॅडम व संस्थेचे अध्यक्ष श्री. विठोबा चव्हाण यांनी केले त्याप्रसंगी श्री देवी आदीष्टी शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस श्री.गणेश चव्हाण , कार्याध्यक्ष जितेंद्र ब्रीद ,संचालक मंगेश जाधव, श्री. विनायक बिजम व संघटनेचे माजी कार्याध्यक्ष डॉ.तुषार बिजम त्याबरोबर भूदाते श्री.चंद्रकांत गुरव व उज्ज्वल गुरव हेदेखील उपस्थित होते.तसेच संघटनेचे अनेक हितचिंतक व माजी विधार्थी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे माजी अध्यक्ष श्री. विनायक बिजम व प्रास्ताविक संघटनेचे सरचिटणीस श्री.आतिष माणगेकर यांनी सादर केले. स्पर्धेत प्रथम क्रमांक चा मानकरी ठरला ओंकार इलेव्हन हरळ तर उपविजेता ठरला जयभवानी इलेव्हन संघ प्रभानवल्ली ठरला तर मालिकावीर म्हणून



ओंकार थरली तसेच उत्कृष्ट फलंदाज- प्रकाश शिंदे, उत्कृष्ट गोलंदाज -गुरू व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक -प्रसाद शिंदे यांना गौरविण्यात आले. स्पर्धेच्या समारोपसाठी प्रमुख पाहुणे म्हणून राजापूर नागरिक संघ मुबई-ग्रामीणचे अध्यक्ष श्री. सुभाष लाड, संस्थेचे कार्याध्यक्ष श्री.जितेंद्र ब्रीद,सरचिटणीस- श्री.गणेश चव्हाण व संचालक - कृष्णकुमार बेर्डे तसेच कल्पना इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंटचे संस्थापक श्री. मंगेश चव्हाण उपस्थित होते. स्पर्धा पार पाडण्यासाठी संघटनेचे अध्यक्ष श्री.संतोष गुरव,उपाध्यक्ष -श्री.प्रसाद गिरकर सरचिटणीस - आतिष माणगेकर, खजिनदार -बिलाल हकीम, कार्याध्यक्ष-संदेश सोमेस्कर, माजी अध्यक्ष -विनायक बीजम, उपसचिव - रुपेश शिंदे ,उप खजिनदार -सचिन वनावडेकर, शाळा संपर्क प्रमुख-प्रथमेश कालेकर व सदस्य - श्री.रविंद्र भातडे, श्री. अमोल पालांडे,समीर जाधव, शुभम शिंदे यांनी अथक परिश्रम घेतले त्याबरोबर माजी विद्यार्थी श्री.शैलेश चव्हाण,भरत शिंदे, भरत गुरव, सलमान फकीर,सिराज फकीर, निलेश जुवले, विवेक पालांडे ,मंगेश चव्हाण, आदम हकीम तसेच अनेक माजी विध्यार्थी व शाळेचे दोन्ही शिपाई श्री.महेश गुरव व दत्तप्रसाद चव्हाण तसेच मार्गदर्शक श्री.जितेंद्र ब्रीद व गणेश चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# भारतीय जनता युवा मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी आनंद ढवळे

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

भारतीय जनता युवा मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या दांडग्या जनसंपर्काचे, युवकांच्या प्रश्नांवरील संवेदनशीलतेचे आणि सतत लोकांमध्ये राहून केलेल्या कामांमुळे ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे.

आनंद ढवळे यांनी पनवेल तालुका भाजयुमो अध्यक्ष म्हणून यापूर्वी काम पाहिले असून, त्यांच्या कार्यकाळात अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. युवकांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न सोडविण्याचा त्यांनी घेतलेला पुढाकार उल्लेखनीय ठरला आहे.भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक निवडणुका अंतर्गत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे आणि पक्षाच्या नियमानुसार जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी त्यांची नियुक्ती नुकताच जाहीर केली.

'प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः' असे भाजपचे मूलमंत्र आहे. त्यामुळे या पक्षाच्या माध्यमातून आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर सतत समाजोपयोगी उपक्रमे राबविले जातात. त्याच अनुषंगाने युवा मोर्चाच्या माध्यमातूनही उपक्रमे आयोजित केली जातात. त्यानुसार पक्षश्रेष्ठींनी दिलेली जबाबदारी आनंद ढवळे यांनी युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष म्हणून यशस्वीरीत्या पार पाडली. त्याचबरोबर सतत जनसंपर्कात राहून लोकांची कामे करत राहणे हा त्यांचा चांगला गुण आहे. सातत्याने पनवेल, उरण या तालुक्यात त्यांनी काम केले आहे. तालुकाध्यक्ष पदावर काम करताना संघटनाला बळकट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. पनवेल व उरण तालुक्यात त्यांनी सातत्याने काम करत लोकांचा विश्वास संपादन केला आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करत पक्षनेतृत्वाने त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली असून, या नियुक्तीमुळे उत्तर रायगडमधील युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निमित्ताने आनंद ढवळे यांनी पक्षश्रेष्ठींप्रती कृतज्ञता व्यक्त केली असून, "उत्तर रायगड जिल्ह्यातील युवकांना संघटित करून त्यांचे प्रश्न सोडवणे, समाजोपयोगी उपक्रम राबविणे आणि पक्षाची विचारसरणी प्रत्येक युवकापर्यंत पोहोचवणे हेच माझे ध्येय राहील," अशी प्रतिक्रिया दिली आहे.



## श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष मा. सुदेश पाटील यांची ठाणे शहर एसीपी मा. माणिक नलावडे यांना सदिच्छा भेट.

दैनिक युवक आधार
सायली साळुंके,

उरण विभागीय कार्यालय प्रमुख श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष मा. सुदेश पाटील यांनी ठाणे शहराचे सहाय्यक पोलीस आयुक्त मा. श्री. माणिक नलावडे यांची गणेश चतुर्थी निम्म्त सदिच्छा भेट घेतली. या भेटीत सद्या राज्यभरात विविध सामाजिक उपक्रम राबवित असून, युवकांचे मार्गदर्शन, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, तसेच वंचित घटकांच्या विकासासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. या कार्यात पोलिस प्रशासनाचे सहकार्य लाभावे, यासाठी सुदेश पाटील यांनी एसीपी मा. माणिक नलावडे यांच्याशी संवाद साधला. यावेळी एसीपी नलावडे यांनी सामाजिक संस्थेचे कार्य सकारात्मक असल्याचे सांगत भविष्यातील उपक्रमांसाठी शक्य ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. या भेटीत परस्पर संवादातून समाजहितासाठी आवश्यक असलेले समन्वयाचे महत्त्व अधोरेखित झाले. श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून होणारे उपक्रम आणि पोलिस प्रशासनाचे पाठबळ यामुळे ठाणे शहरासह राज्यातील सामाजिक बांधिलकी अधिक सक्षम होईल, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील यांनी व्यक्त केला.

**दैनिक युवक आधार**
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# रक्त नव्हे, हा तर सिकलसेल ग्रस्त मुलांसाठी जीवनदायी अमृताचा ठेवाच ! : डॉ. अभिजीत कपिले

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**

रक्तदान शिबिरात होणारे रक्तदान हे केवळ रक्त संकलन नसून जिल्ह्यातील सिकलसेल आणि थॅलेसेमिया ग्रस्त मुलांसाठी जीवनदायी अमृताचा ठेवाच असल्याचे प्रतिपादन शासकीय रक्तपेढी यवतमाळचे रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. अभिजीत कपिले यांनी केले. अशा रक्तदान शिबिरातून संकलित केलेले रक्त अपघातग्रस्त रुग्ण, प्रसूतीसाठी येणाऱ्या महिला व रक्ताच्या कमतरतेने ग्रस्त बालकांसाठी जीवनदायी वरदान ठरत असल्याचे रक्तदान शिबिरात रक्तदात्त्यांशी संवाद साधतांना ते म्हणाले. ईद-ए-मिलादच्या पवित्र पर्वावर डॉ एपीजे अब्दुल कलाम फोरम दिग्रस द्वारा आयोजित रक्तदान शिबिर अतिशय उत्साहात पार पडले. समाजातील सर्व जाती धर्माच्या, सर्व स्तरातील तब्बल दोनशे रक्तदात्यांनी रक्तदान करून या जीवनदायी, मानवतावादी व पवित्र कार्यात मोलाचा वाटा उचलला.

महिलांचे पहिल्यांदाच रक्तदान!

शिबिराच्या पाच वर्षांच्या इतिहासात यंदा पहिल्यांदाच महिलांनी रक्तदान केले. अंजुम परवीन आणि मो. अतिक शेख तसेच मलेका सय्यद आणि राहील सय्यद या दांपत्याने यावेळी रक्तदान करुन आगळावेगळा आदर्श सर्वांसमोर ठेवला. तर तब्बसुम परवीन मुख्तार खान, सूफिया परसुवाले, रेश्मा आसिफ इसानी, गुलनाज शेख नाजीम, सुमैया परवीन सैय्यद इरफान या महिलांनी पहिल्यांदा रक्तदान शिबिरात सहभागी होत रक्तदानाच्या पवित्र कार्यात सहभाग नोंदवला. पोलिस उपनिरीक्षक राजेश लाखकर, विद्यानिकेतन शाळेचे प्राचार्य निवृत्ती ढोडरे, जिल्हा परिषद शाळा सावंगा येथील मुख्याध्यापक गुलाब तायडे, आरोग्य विभागाचे डॉ. कपिल मुनेश्वर, मराठा सेवा संघाचे दिलीप महिपाल, एस टी महामंडळाचे कर्मचारी चंदन देविदास आडे आणि होमराज जाधव, पत्रकार किशोर कदम, गोदावरी बँकेचे अमोल बोंडगे, क्रीडा शिक्षक आशिष अगलदरे, अनिल किसनराव नवघरे, किशोर अमरसिंग जाधव, रोहन नारायण जाधव, संजय रामराव मुन्नारवार, पुरुषोत्तम नारायण पंडितकर, विजय मधुकर अंबुरे, धीरज गोविंदराव ठाकरे यांनीही रक्तदान केले.



ईद-ए-मिलादच्या या मंगलदिनी डिजे वाजविण्यापेक्षा 'जीवन' वाचविण्याचा, सामाजिक सलोख्याचा, एकजुटीचा, मानवतेचा आणि जीवनदानाचा हा अतिशय उपयुक्त असा उपक्रम असल्याचे मत शिबिरास भेटी देणाऱ्या मान्यवरांनी व्यक्त केले. शिबिरात केवळ दोनशे युनिट्स रक्त जमा झाले नाही, तर दिग्रसकरांनी विविधतेत एकता आणि सामाजिक सलोख्याचा कृतीयुक्त संदेश दिल्याचा सूर भेटी देणाऱ्या मान्यवरांचा होता. रक्तदान शिबिरात रक्तदात्यांची रीघ लागली होती. रक्त संकलन पिशव्या संपल्या पण रक्तदाते कमी पडले नाहीत. या शिबिरात विद्यार्थी, शिक्षक, अभियंता, डॉक्टर, वकील, पोलिस, शासकीय कर्मचारी व अधिकारी, व्यापारी, पत्रकार, कामगार, मजूर, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांनी रक्तदान करून सर्वसमावेशकतेचे आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ रक्तपेढीचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अभिजीत कपिले, समाजसेवा अधीक्षक आशिष दहापुते, अधिपरिचालक विजय कुन्हे व इतर कर्मचारी, ग्रामीण रुग्णालय दिग्रसचे अधीक्षक डॉ. विरेंद्र अस्वार, डॉ संजय जाधव, गोदावरी मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे शाखा व्यवस्थापक राहुल कोल्हे पाटील, सफिया रहमान शैक्षणिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे मझहर खान आणि दिग्रस तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष पी पी पप्पुवाले यांचे मोलाचे सहकार्य लाभले. डॉ कलाम फोरमचे मुख्य कार्यवाह मिर्जा अफजल बेग, अध्यक्ष फिरोज खान, सचिव आमीन चौहान, प्रकल्प प्रमुख फारुक अहेमद, कार्याध्यक्ष अमीन नौरंगाबादे, नासिर बेग, उपाध्यक्ष हाजी अजीम खान, कोषाध्यक्ष आसिफ शेख, प्रसिद्धी प्रमुख फैय्याज शेख, आतिक शेख, जावेद परसुवाले, फारुक चव्हाण, शोएब मलनस यांचेसह सर्व सदस्यांनी तसेच गोदावरी बँकेचे सुयोग महल्ले, हर्षल बदूकले, सलमान शेख, राहुल कटेकर, नयन पाटील, आफताब शेख, ओम ठाकरे, अमोल बोंडगे, निलेश बोरोकर, असलम शेख यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले.

## खुनाच्या गुन्ह्यातील सहा वर्षां पासून फरार आरोपीला हैदराबाद येथून अटक

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

खुनाच्या गुन्ह्यातील सहा वर्षांपासून फरार आरोपीला कामोठे पोलिसांनी हैदराबाद येथून अटक केली. मनोहर यशवंत सरोदे असे आरोपीचे नाव आहे.

कामोठे पोलीस ठाण्यात 2019 मध्ये हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पती मनोहर सरोदे (५०) हा तिला मारहाण करत असे. डिसेंबर 2019 मध्ये आरोपी मद्य पिऊन चिकन घेऊन आला आणि ताटात चिकन कमी आले म्हणून बोलून पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतला आणि तिला मारहाण करून तिच्या अंगावर रॉकेल टाकून पेटवून दिले. यात तिचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी मनोहर सरोदे (राहणार गणपुर, नांदेड) तत्कालीन ठिकाण जुई गाव, कामोठे येथून पळून गेला होता. त्याच्या मूळ गावी




पोलीस पथके पाठवून तपास केला. मात्र आरोपी मूळ गावी गेलेला नव्हता आणि तो मोबाईल वापरत नव्हता. त्यामुळे त्याचा शोध घेणे कठीण झाले. आरोपी हैदराबाद, तेलंगणा येथे असून नातेवाईकांच्या संपर्कात असल्याचे पोलिसांना समजले. त्यानुसार गुप्त माहिती काढून आणि तांत्रिक तपासाद्वारे आरोपीची माहिती प्राप्त केली. यावेळी तो हैदराबाद येथे जहांगीराबाद येथे खोट्या नावाने राहत असल्याची माहिती मिळाली. कामोठे पोलिसांनी पथक तयार करून त्याचा शोध घेतला. यावेळी बगलागुंडा या पोलीस ठाण्याच्या हद्दीत आरोपी मनोहर हा पिंटू कुमार या खोट्या नावाने राहत होता. त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.

## लालबागचा राजा येथे खा खेळा वाचा अभियान राबवले

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

: गणेशोत्सव म्हणजे महाराष्ट्राच्या सर्व सणांपैकी सर्वोच्च, जो पूर्ण महाराष्ट्रभर नव्हे तर भारतभर देखील साजरा केला जातो. आणि या सणाचं महाराष्ट्रातलं मुख्य केंद्रबिंदू म्हणजे प्रतिष्ठित नामांकित असा गणपती म्हणजे लालबागचा राजा. या लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी पूर्ण भारतभरातून लाखो भावी दर्शनासाठी येतात आणि बाप्पांचा आशीर्वाद घेतात, हे औचित्य साधून अपर्णा राजेश शहा संस्थापित खा खेळा वाचा हे अभियान देखील तेथे पोहोचले. अपर्णा शहा स्वतः तिथे पोहोचल्या आणि या अभियानाचा आवाज बाप्पांचे दर्शन घेत त्यांनीही दिला.

तब्बल दहा दिवस ईपीआरचे राजदूत या अभियानांतर्गत भाविकांची भेट घेत या अभियानाचा प्रचार एवं प्रसार करत




त्यांना आनंद दिला, तो म्हणजे विविध खेळ मुलं एवं प्रौढ व्यक्ती या सर्वांनी खेळ खेळून मनमुराद आनंद लुटला. अनेक तासांचा उभा असलेला थकवा दुरावला, रांगेत केवळ उभे राहण्यापेक्षा काही पुस्तकं त्यांना वाचण्यात दिली. यात त्यांचा वेळही निघाला आणि काही नवीन गोष्टींची माहिती त्यांना मिळाली. ईपीआर अंतर्गत आलेल्या भाविकांना त्यांचा थकवा दूर करण्यास एवम त्यांना एक नवीन दिशा देण्यास समर्थ ठरले.

# राष्ट्रीय मोदी सेवा समितीच्या कार्यकर्ता मेळावा उत्साहात साजरा डॉ शरद कुमार तेलगाणे यांच्या समाज सेवेमुळे गैरगरिबा न्याय






दैनिक युवक आधार
उदगीर प्रतिनिधी बालाजी तेलंगे

लातूर (उदगीर) : राष्ट्रीय मोदी सेवा समिती, संपूर्ण भारत आयोजित कार्यकर्ता मेळावा उदगीर येथील शासकीय विश्रामगृहात भव्यदिव्य वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्याला समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष हिंदु शेर विकासजी यदुवंशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाराष्ट्र प्रदेश संगठन महामंत्री डॉ. शरदकुमार तेलगाने यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात राष्ट्रीय महामंत्री सौ. रिव्या देवी, बालाजी नारायण सूर्यवंशी, प्रदेशाध्यक्ष उत्तर प्रदेश, विनोद चौधरी, प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र, अंकुश जाधव, तसेच देशभरातील मान्यवर पदाधिकारी मोठ्या संख्यने उपस्थित होते .
उदगीर दर्शनानंतर राष्ट्रीय अध्यक्ष विकास यदुवंशी यांचे प्रभावी मार्गदर्शन ४५ लाख कार्यकर्त्यांच्या बळावर योजनांचा जनतेत प्रसार
संख्येने उपस्थित होते. स्थानिक स्तरावर भाजपाचे जिल्हा सरचिटणीस बसवराज रोडगे, भाजपचे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुलजी केंद्रे, भाजप युवा मो जिल्हाध्यक्ष अमोल निडवडे, शहराध्यक्ष अमोल अनकल्ले, माजी नगरसेवक, पंचायत समिती सदस्य व विविध तालुकाध्यक्षांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. अध्यक्षीय भाषणात विकास यदुवंशी म्हणाले की, 'केंद्र सरकारच्या तब्बल २५३ योजना सुरू आहेत, मात्र अनेक लोकप्रतिनिधींना त्याची माहितीच नाही. त्यामुळे या योजना खऱ्या अथनि जनतेपर्यंत पोहोचाव्यात या उद्देशाने आम्ही भारतभर दौरा करीत आहोत.' यावेळी त्यांनी समितीच्या ४५ लाख कार्यकर्त्यांचा वाढता जनाधार अधोरेखित केला. महिलांच्या कल्याणकारी योजनांचा उल्लेख करताना त्यांनी महिलांच्या सन्मानासाठी ठाम भूमिका मांडली. देशातील स्त्री हीमाताआहे,तिच्याकडे वाकडी नजर टाकणाऱ्यांना समज द्यायलाच हवी, असे ते ठामपणे म्हणाले.हिंदू धर्माच्या परंपरा, चालीरीती यांचा इतर धर्मियांनीही सन्मान करायला हवा, असा संदेश त्यांनी दिला.

मेळाव्याचे सूत्रसंचालन महेश धोंडिहिप्परगेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. शरदकुमार तेलगाने यांनी केले. 'कार्यक्रमाच्या अगोदर सकाळी राष्ट्रीय अध्यक्षांनी उदगीरचे दैवत श्री उदागीरबाबा मंदिर तसेच बौद्ध विहार, बसवेश्वर चौक, शिवाजी चौक, नाईक चौक यांसह शहरातील विविध धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेट देत उदगीर येथील अनेक कामाची पाहाणी केली

# उरण द्रोणगिरी नोड मध्ये प्रथमच पारंपरिक लाकडी घाण्याचे शुद्ध व नैसर्गिक तेल

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी**

आजकाल बाजारात मिळणारे स्वयंपाकात वापराचे तेलामध्ये भरमसाठ भेसळ आढळते तेलातील भेसळ म्हणजे तेलामध्ये कमी प्रतीचे कृत्रिम पदार्थ मिसळून त्यांची गुणवत्ता कमी केली जाते मोहरीचे तेल, सोयाबीन तेल, शेंगदाणे तेल तेलामध्ये खनिजे ,कारंजे तेल किंवा अन्य स्वस्त तेल मिसळली जातात त्यामुळे तेलाची चव आणि वास बदलतो. धूर लवकर होतो आणि आरोग्यावर याचा गंभीर दुष्परिणाम होऊ शकतो.

भेसळयुक्त तेलाला पर्याय म्हणजे लाकडी घाण्याचे तेल होय. नैसर्गिक रित्या पौष्टिक, चवीला रुचकर आणि आरोग्यासाठी फायदेशीर हे तेल असते. कारण ते तेल काढण्याच्या प्रक्रियेत उष्णता कमी वापरली जाते .हे तेल शरीराला प्रथिने, जीवनसत्वे आणि आवश्यक फॅटी ऍसिड पुरवते जे हृदय त्वचा केस हाडांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे असते .हे तेल रिफाइंड तेलापेक्षा अधिक चांगले मानले जाते. कारण त्यात पोषणमूल्य टिकून राहतात या तेलात प्रथिने आणि कॅल्शियम असतात जे हाडे आणि स्नायूंना मजबूत करतात. सांधेदुखी मध्ये आराम देऊ शकतात. रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि संक्रमणापासून संरक्षण होते.

उत्तम आरोग्य हि मानवाची धनसंपदा आहे. पैशापेक्षा व इतर भौतिक गोष्टीं पेक्षा शारीरिक व मानसिक दृष्ट्या निरोगी असणे आज गरजेचे बनले आहे. उत्तम आरोग्यामुळे माणूस कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो .याकरता आरोग्यम् धनसंपदा हा विचार जपण्यासाठी ललिता शिंदे, श्वेता वासनिक, कविता शिंगाडे या तीन सख्या एकत्र येऊन त्यांनी द्रोणागिरी सेक्टर ५३ कृष्णा हाइट्स, शॉप नंबर ५येथे शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी पारंपरिक लाकडी खाण्याचे शुद्ध व नैसर्गिक तेल मिळण्यासाठीचे दुकानाचे उद्घाटन उरणचे आमदार मा.महेश बालदी साहेब यांच्या शुभहस्ते या दुकानाचे उद्घाटन झाले.दुकानाच्या उद्घाटन प्रसंगी विविध मान्यवरांनी उपस्थिती लावली.

खरं तर महिला एकत्र येणं म्हणजे एकमेकींविषयी मत्सर,हेवा दावा, बडबड गप्पा हे समिकरण रुढ झाले आहे. पण या विचारांचे खंडन करुन ललिता शिंदे,श्वेता वासनिक व कविता शिंगाडे यांनी महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी , त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांना गृह उद्योग देण्यासाठी त्यांनी बनवलेल्या वस्तू, यांना बाजारपेठ मिळण्यासाठी लाकडी तेल घाण्याच्या या" फार्म ओरा"दुकानाच्या माध्यमातून एक व्यासपीठ तसेच त्यांच्या व्यवसायासाठी हातभार लावण्यासाठी प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर



पारंपरिक पद्धतीचे शुद्ध व पौष्टिक लाकडी घेण्याचे तेल ग्राहकाच्या नजरेदेखत या मशीन मधून काढण्यात येणार आहे. या तेलात कोणतेही प्रेझर्वेटीव किंवा केमिकल्स न वापरता पर्यावरण पूरक नैसर्गिक रित्या हे तेल काढले जाणार आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बाबासाहेबांनी महिलांसाठी महिला सक्षमीकरणासाठी जे पाऊल उचलले होते त्याच विचारधारेचा अवलंब करून या तीन महिला महिला सक्षमीकरणाचा साठी प्रयत्न करत आहेत.

या लाकडी तेलाचा फार्मूला याची माहिती पाहिली असता हा लाकडी तेल घाणा पुर्वीच्या बैलांच्या घाण्यात आतमध्ये दगड असायचा, तो दगड व बाभळीची लाट वापरून नैसर्गिक रित्या पौष्टिक तेल निर्मिती केली जाणार आहे. ग्राहकांना चांगल्या प्रतीचे तेल मिळण्यासाठी साठी हा प्रकल्प चालू केला आहे. याकरता पुणे येथे जाऊन मॅक्स लॉर्ड ग्लोबल इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड पुणे येथील सहदेव कारंजकर व पल्लवी कारंजकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही तेल घाणा मशीन घेऊन त्याचप्रमाणे या व्यवसायाबद्दलची संपूर्ण माहिती ललिता शिंदे ,श्वेता वासनिक व कविता शिंगाडे यांनी घेऊन याकरिता वापरण्यात येणारे बी
ते कोणते असावे? तेलाची पॅकिंग कशी असावी ?याबद्दलची सर्व माहिती घेण्यात आली संपूर्ण शास्त्रशुद्ध माहिती घेतल्यामुळे आज या लाकडी घाण्याचा व्यवसाय या भगिनी चालू करत आहेत. त्याचबरोबर कांस्य धातूपासून बनवलेली मसाज थाळी मुळे गुडघेदुखी, टाच दुखी, कंबर दुखी, शरीरातील पित्ताचे, प्रमाण वाढलेली अतिरिक्त उष्णता, डोळ्यांचे स्नायू, शरीरातील थकवा, शरीरातील वाताचे प्रमाण ,मधुमेह पायावरची सूज, तळव्याच्या भेगा अशा अनेक समस्या या कास्याच्या धातूच्या मसाज थाळी मुळे दूर होणार आहेत. ही सुविधा देखील याठिकाणी उपलब्ध केली आहे.

फॉर्मुला या ब्रँड सोबतच या आरोग्यवर्धक तेलांसोबतच लवकरच आरोग्यदायी व पौष्टिक उत्पादने या महिलांचा फॉर्मुला या नावाने बाजारात विक्रीसाठी आणणार आहेत. आपल्या पूर्वजांनी आपल्याला जो आरोग्याचा ठेवा दिला त्याचा आजकाल विसर पडत आहे त्यामुळे हा विचार पुन्हा मानवी जीवनात येण्यासाठी ललिता शिंदे ,श्वेता वासनिक,कविता शिंगाडे यांच्या संकल्पनेतून साकार होणाऱ्या या दुकानात प्रत्येक ग्राहकाने, नागरिकांनी अवश्य भेट द्यावी असे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे.
याकरता पत्ता द्रोणागिरी नोड, सेक्टर ५३ कृष्णा हाइट्स शॉप नंबर ५ उरण, येथे अवश्य भेट द्यावी.
याकरता संपर्क नंबर :-
९३२४४५३८०२ किंवा ७३०४३८४०४२ किंवा ९०८२८१६१४९ येथे संपर्क साधावा.

# पत्रकार गिरमाजी सुर्यकार यांना महाराष्ट्र राज्य युवक आधार रत्न पुरस्काराने सन्मानित !

## न्यूज 18 चे सहसंपादक विलास बडे सर आणि साम टीव्ही चे संपादक निलेश खरे सर यांच्या हस्ते प्रदान

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी गिरमाजी सुर्यकार**

पनवेल आणि महाराष्ट्रात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या 'दैनिक युवक आधार' या वृत्तपत्राचा दुसरा वर्धापनदिन सोहळा रविवार दि ७ सप्टेंबर रोजी उत्साहात आणि थाटामाटात पार पडला. यावेळी विविध क्षेत्रातील गुणवंत व्यक्तिमत्त्वांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सोहळ्याचे उद्घाटन उद्योगपती सुधीर कटेकर, न्यूज १८ लोकमतचे सहसंपादक विलास बडे, साम टीव्हीचे मुख्य संपादक निलेश खरे आणि प्रसिद्ध अभिनेत्री माधवी जुवेकर,उद्योगपती सुधीर कटेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाला बाल कलाकार अर्जुनी सस्ते, समीर पाडळकर,सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी विलास बडे यांनी सांगितले, की प्रत्येक व्यक्तीने संधी आल्यावर आपला कणा दाखवायला पाहिजे. जिथे अन्याय होतो त्या ठिकाणी पत्रकारांनी व जनतेने आपली भूमिका स्पष्ट करून, न्याय मिळवण्यासाठी झटले पाहिजे, तसेच "ज्या ठिकाणी आपली स्पष्ट भूमिका मांडावी अशी वेळ येते, तिथे मौन पाळणे योग्य नाही. पत्रकारिता हे केवळ बातम्या देण्याचे काम नसून, ती एक सामाजिक जबाबदारी आहे. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळावा यासाठी आपण सक्रिय भूमिका बजावली पाहिजे."असे शब्द त्यांनी व्यक्त केले. तर त्यांनी या वृत्तपत्राने अल्पावधीत केलेल्या सत्यासमाजहिताच्या कामाचा उल्लेख केला.

पुरस्कार स्वीकृतीवेळी व्यक्त केलेल्या भावना
पुरस्कार स्वीकारल्यानंतर गिरमाजी सुर्यकार यांनी सांगितले की, “हा पुरस्कार माझ्या सोबत सतत खंबीरपणे उभ्या असलेल्या मार्गदर्शक व कार्यकर्त्यांचा आहे. युवकांना प्रेरणा देणारे काम करण्याची हीच खरी वेळ आहे आणि हा सन्मान पत्रकार क्षेत्र आणि समाजकारणासाठी आणखी माझ्यासाठी आणखी उर्जा देणारा आहे.

समाजातील युवकांना प्रेरणा देणाऱ्या आणि सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या दैनिक युवक आधार तालुका प्रतिनिधी गिरमाजी सुर्यकार यांना महाराष्ट्र राज्य युवक आधार रत्न पुरस्कार प्राप्त झाला आहे. या यशाबद्दल जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्था तसेच मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे.




# मा.शिवाली माने देशमुख ठरल्या राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापिका पुरस्काराच्या मानकरी

दैनिक युवक आधार
सणसरः- विकास क्षत्रिय



दैनिक युवक आधार यांच्या मार्फत देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या शिवाल माने देशमुख यांना सन्माननीत करण्यात आला सदर पुरस्कार सोहळा 7 सप्टेंबर रोजी पनवेल येथे लोकमतचे विलास बडे साम टीव्हचे निलेश खरे प्रसिद्ध अभिनेत्री माधवी जुवेकर यांच्या हस्ते शगून हॉल येथे देण्यात आला हा पुरस्कार एक कर्तव्यदक्ष आणि प्रत्येक सामाजिक कार्यात एक जबाबदार व्यक्तिमत्व म्हणून ख्याती असलेल्या व्यक्तीनां दिला जातो

त्यांनी आपल्या महाविद्यालया मध्ये आपल्या कार्याने एक मानाचे स्थान निर्माण केले आहे एक प्राचार्या म्हणून त्यांनी आपल्या महाविद्यालयात विविध उपक्रम राबवले आणि त्याची अंमलबजावणी ही स्वतः काळजीने करून घेतात यामध्ये परीक्षा जादा तास सराव टेस्ट एवढेच नाही तर क्रीडा इंग्रजी ग्रामर हिंदी स्पर्धा परीक्षा इन्स्पायर अवार्ड खेळ विभाग क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे.आपल्या कार्याने प्रत्येक क्षेत्रात भवानीनगर परिसरात महाविद्यालयाने एक अग्रगण्य स्थान निर्माण केले आहे.या सर्वाचे श्रेय प्राचार्या शिवाली माने देशमुख मॅडम आणि त्यांचा महाविद्यालयाचा सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी स्टाफ यांना दिले जाते.त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी संस्थेच्या अध्यक्ष पृथ्वीराज बापू जाचक उपाध्यक्ष कैलास गावडे,जेष्ठ माजी संचालक मुरलीधर काका निंबाळकर सरपंच यशवंत पाटील व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी स्टाफ सणसर ग्रामस्थच्या वतीने अभिनंदन करून कौतुक करण्यात आले.

# श्री एन बी शेळके विद्यालय कुंभी यांच्यातर्फे विद्यार्थी संदेश राठोड यांचा केला सत्कार

दैनिक युवक आधार
उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील

कुंभीः-एम श्री.एन.बी.शेळके विद्यालय कुंभी येथे संस्थेचे सचिव श्री. चंद्रकांतदादा ठाकरे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष वाशिम यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व तसेच शाळा समिती अध्यक्ष व माजी जि.प.सदस्य श्रीमती प्रतिभाताई शेळके श्री आर.के राठोड जि.प.सदस्य माजी प.स.सभापती श्री भास्कर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत वसंतवाडी येथील गरिब कुटुंबातील ऊस तोड कामगारांचा मुलगा संदेश रामराव राठोड यांचा विद्यालयाच्या वतीने व दादासाहेबांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.संदेश हा युनिव्हर्सिटी ऑफ एडिनबर्ग लंडन येथे उच्च शिक्षणासाठी निवड झाली आहे

तसेच संदेश ला तब्बल 55 लाख रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली असून त्यानें मिळवलेल्या यशा बदल त्याचा सत्कार करण्यात आला.त्याचे प्राथमिक शिक्षण जि. प. शाळा वसंतवाडी(तांडा) येथे झाले व पुढील शिक्षण पाचवी ते बारावी श्री.एन.बी.शेळके विद्यालय कुंभी येथे झाले व विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या यावेळेस विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री काळे सर तसेच माजी मुख्याध्यापक श्री मानेकर सर श्री व्यवहारे सर माजी प.स. सदस्य अनंत कुमार शेळके संदेश चे वडील उपस्थित होते व जेष्ठ नागरिक व कर्मचारी वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ओबीसी विरोधी हैद्राबाद गझेट जीआर तत्काळ रद्द करा व ओबीसी समाज बांधवांच्या मागण्या मान्य करा



दैनिक युवक आधार पाटोदा(प्रतिनिधी) - पाटोदा तालुक्यातील ओबीसी बांधवांनी एकत्र येऊन उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदनाद्वारे हैद्राबाद गझेट जी.आर.रद्द करण्याची आणि ओबीसी बांधवांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी निवेदन दिले आहे. निवेदनामध्ये ओबीसी विरोधी हैद्राबाद गझेट जी.आर.तात्काळ रद्द करा, ओबीसी विरोधी न्यायमूर्ती शिंदे समिती रद्द करा, न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने शोधलेल्या बोगस ५८ लाख कुणबी नोंदी रद्द करुन वितरीत केलेल्या कुणबी जात प्रमाणपत्रांची पारदर्शक चौकशी करा, महाराष्ट्र राज्याची जातीनिहाय जनगणना करुन ओबीसींची लोकसंख्या जाहीर करा, कुणबी जात प्रमाणपत्रांची पारदर्शक चौकशी करा. तामिळनाडू सरकार प्रमाणे आरक्षणाची ७५% मर्यादा वाढवून ओबीसी, एस.सी., एस.टी. प्रवर्गाना लोकसंख्येप्रमाणे आरक्षणाची अंमलबजावणी करा, ओबीसींना संपूर्ण भारतात लोकसभा व विधानसभेत मतदार संघ आरक्षीत करा, मंडल आयोगाची ओबीसींना कायदेशिर अंमलबजावणी करुन सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक न्याय द्या, ओबीसींच्या लोकसंख्येप्रमाणे आर्थिक व शैक्षणिक तरतुद करा, ओबीसी विद्यार्थ्यांना महामंडळ निर्देशांकांप्रमाणे शिष्यवृत्ती देऊन प्रत्येक तालुकास्तरावर शासकिय वस्तीगृह सुरु करुन अत्याधुनिक सुविधा द्या, ओबीसी कर्मचाऱ्यांचे विभागांतर्गत रिक्त पदे त्वरीत पदोन्नतीतून भरा, वरील मागण्या प्रमाणे ओबीसी विरोधी हैद्राबाद गॅजेट जी.आर. तात्काळ शासनाने रद्द करण्यात यावा. नसता लोकशाही पध्दतीने अंदोलन करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहिल असा निवेदनाद्वारे मागण्या केल्या आहेत. या निवेदनाच्या प्रती मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य मुंबई, मा.ना.मुख्यमंत्री साहेब, महाराष्ट्र राज्य मुंबई, मा.जिल्हाधिकारी साहेब, बीड यांना देण्यात आलेल्या आहेत. या निवेदनावर छगनराव मुळे, माजी प.स.सभापती अनिल जायभाय, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दिगंबर नाईकनवरे, माजी सरपंच आनंद राऊत, सुर्वसे पाचंग्री, विनोद राऊत, माजी सरपंच हनुमान शेलार, न.प.सभापती रामेश्वर गोरे, गणेश खाडे (माजी सैनिक), संपत नागरगोजे, शेलार कृष्णा, सुदर्शन गोरे, गणेश शेवाळे, सानप गणेश, काळुशे पियुस, आबा गर्जे, संतोष नाईकनवरे, खंडागळे विष्णू, विक्रम राऊत, श्रीधर राऊत, नाईकनवरे दत्तोबा, अंकुश अशोक, आदींच्या सह्या आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मध्ये आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# रा.जि.प.उर्दु पाभरे शाळा शिक्षिका नाझनीन खान राष्ट्रिय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**अण्णासाहेब आहेर**



रा.जि.प.पाभरे उर्दु शाळा शिक्षिका नाझनीन इर्शाद खान यांनी रायगड जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात दैदिप्यमान काम केले असल्याने त्यांना कौमी उर्दु शिक्षक कर्मचारी संघातर्फे दिल्ली येथे ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षक कर्मचारी संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष वासील अलीसर आणि मान्यवरांचे हस्ते शाल,सुवर्ण पदक,प्रशस्तीपत्र,सन्मानचिन्ह देऊन कौटुंबिक येथोचित सन्मान करण्यात आला.आयोजीत सन्मान सोहळ्यात मान्यवरांचे हस्ते विविध राज्यातील २२ शिक्षक व प्राध्यापक यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय अध्यक्ष वासील अलीसर,सेक्रेटरी विकास कुमार राणा,कुमार श्रीवास्तव,मुस्लिम युनिव्हर्सिटी प्रोफेसर जीयारहेमान आलीगड,राज्य स्तरीय मान्यवर प्रोफेसर आणि शिक्षक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमांचे सूत्रसंचालन उत्तर प्रदेशचे प्रा. सहाना सैफी यांनी केले.रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुका पाभरे येथील उर्दु शिक्षिका नाझनीन इर्शाद खान यांनी शिक्षण क्षेत्रात दैदिप्यमान काम केल्याने त्यांच्या नावाची जिल्हा भरातून एकमेव उर्दू शिक्षिका पुरस्कार प्राप्त निवड झाली आणि त्यांना राष्ट्रीय स्तरावर कौमी उर्दु शिक्षक कर्मचारी संघातर्फे देशाची राजधानी दिल्ली येथे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले असल्याने खान यांचे शैक्षणिक, सामाजिक आणि मित्र परिवारातर्फे अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुदेश पाटील ठाणे शहर A C P मा.श्री.माणिक नलावडे( दैनिक युवक आधार )

# पालोदकर महाविद्यालयात स्वयंशासन दिन साजरा



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड :- सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात भारताचे माझी राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वयंशासन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी स्वतः दैनिक परिपाठ घेऊन शाळेच्या कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व शिक्षकांनी डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षक, मुख्याध्यापक व प्राचार्य बनून दिवसभर अध्यापनाचा व शाळा व्यवस्थापनाचा अनुभव घेतला. पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षिका म्हणून सहभाग नोंदवत आपल्या आवडत्या विषयाचे अध्यापन केले.

स्वयंशासन दिनानिमित्त प्राचार्य अंजुम शेख, मुख्याध्यापक प्रीती बनकर, पर्यवेक्षक संजना निकम या विद्यार्थिनींने काम पाहिले. सुदिक्षा गव्हाणे, शिल्पा दांडगे यांनी स्वागत गीत गाऊन प्रमुख पाहुण्याचे स्वागत केले. वैष्णवी हिवाळे यांनी सूत्रसंचालन केले. वर्गात अध्ययन करताना शिक्षक म्हणून आलेले अनुभव प्रतीक्षा गव्हाणे, प्रांजल ढोरमारे, जानवी ढोरमारे, कोमल पारवे, कांचन सपकाळ, दुर्गा जाधव, रोहिणी गव्हाणे, कृष्णा भांमरे या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणात सांगितले. तर सहभागी विद्यार्थ्यातून अजिनाथ बर्डे, अक्षरा लोखंडे, तनुजा धनवट यांना उत्कृष्ट शिक्षक पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी प्रदीप कानडजे, कृष्णा पाटील, डॉ रमेश काळे, दिलीप जाधव या शिक्षकांनी आपल्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच चांगले नागरिक बनण्याचे आवाहन आपल्या भाषणात केले.

प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांनी शिक्षकांचे महत्त्व अधोरेखित करणारे भाषण केले व शिक्षकाप्रती सदैव ऋणी राहण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील शिक्षक कृष्णा भांडारे, राजेश ठोंबरे, सुनील सागरे, योगेश निंभोरे, राजाभाऊ भोसले, गणेश दिवटे, संजय जाधव, महादेवी ठवरे, जयश्री चापे, संतुकराव मोरे, अक्षय निकम यांना गुलाबपुष्प देऊन शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथे आमरण उपोषण

दैनिक युवक आधार
विदर्भ प्रतिनिधी कपिल राठोड

पोहरादेवी ता. मनोरा हैद्राबाद गॅझेट नुसार महाराष्ट्रातील बंजारा समाजाला एसटी आरक्षण लागू करण्यात आला पाहिजे यासाठी तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथे आमरण उपोषणाला रमेश उर्फ सोनू पवार आज पासून सुरू केला आहे. व त्याच्या आमरण उपोषणाला माजी आमदार अनंत कुमार पाटील, महंत रमेश महाराज,समिल राठोड फुलउमरी , महंत संजय महाराज, जयराम महाराज वसंतनगर सरपंच गणेश जाधव व उमरिगडाचे माजी सरपंच कपिल पवार हरीश राठोड गोपाल राठोड व पोहरादेवीचे पोलिस पाटील तथा संजय राठोड मारोती राठोड प्रदीप राठोड अर्जुन जाधव जितेंद्र राठोड नवीन राठोड विपुल राठोड व इतर बंजारा समाजातील लोकांनी भेट दिली....



# अशोक पाटील साखळे यांचा शेकडो समर्थकांसह भाजपात प्रवेश

## माजी केंद्रीय रेल्वेमंत्री राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी :- योगेश पालोदकर

सिल्लोड :- तालुक्यातील लिहाखेडी विविध सहकारी सहकारी संस्थेचा चेअरमन पदाचा पंचवीस वर्षांपासून कारभार सांभाळत असलेले व प्रगतशील शेतकरी अशोकराव काशिराम पाटील साखळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी,अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे,रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून, केंद्रीय माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी , शिवसेना पक्षांसह विविध पक्षांच्या शेकडो कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

या वेळी माजी आमदार सांडु पाटील लोखंडे,भारतीय जनता पक्षाचे प्रदेश चिटणीस सुरेश बनकर,भाजप अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर मोठे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर,भाजप सिल्लोड मंडळाध्यक्ष मनोज मोरेल्लु, भवन मडळाध्यक्ष एकनाथ हिवाळे,शिवना मंडळाध्यक्ष आत्माराम पाडळे,विजय वानखेडे, अंबादास सपकाळ, विनोद चव्हाण,संजय बावस्कर, यांची उपस्थिती होती.



भारतीय जनता पक्षाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकोपयोगी विविध योजना राबवुन जन सामान्याचा फायदा होईल अशा योजना राबवुन देश एक महासत्ता बनविण्यासाठी जी घोडदौड सुरू या वर मी व माझे समर्थक अगदी आनंदीत होऊन आम्ही भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहोत.
– अशोक साखळे
चेअरमन ,लिहाखेडी

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) तालुका कार्याध्यक्ष हरिदास साखळे, दामोदर साखळे,नाना राकडे, विष्णू फरकाडे,जयवंता फरकाडे, देविदास सपकाळ,सयाजी गोरे, समाधान वराडे, संजय बावस्कर, आकाश साखळे, निवृत्ती साखळे, बालाजी फरकाडे, ब्रम्हानंद साखळे, विशाल साखळे, आप्पा साखळे,राम साखळे,ओम साखळे,शुभम साखळे, शिवाजी सरोदे, मच्छिंद्र सपकाळ,सागर पोटदुखे,पवन पोटदुखे, साहेबराव चव्हाण, हिंमत मकवाने, प्रभाकर वाघ,चंदु वाघ, सुनील मुळे, दिलीप इंगळे, संजय वाघ, शंकर उबाळे आदी सह शेकडो कार्यकर्त्यांनी प्रवेश केला

# जासई विद्यालयात शिक्षक दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

दैनिक युवक आधार
जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर

आज मंगळवार दिनांक ०९ सप्टेंबर/२०२५रोजी श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.वा.पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई येथे शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी जासई गावचे शिक्षण प्रेमी तात्या. विद्यालयाच्या प्राचार्या म्हात्रे के. जी. मॅडम विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ.मुकादम मॅडम तसेच सर्व सेवकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. या शिक्षक दिनासाठी इयत्ता दहावीच्या जवळजवळ ७० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेऊन शाळेतील विविध पदांच्या भुनिका पार पाडल्या. यामध्ये रक्षक घरत याने मुख्याध्यापकाची भूमिका साकारतानाआलेले अनुभव अगदी मनमोकळे पणे सर्वांसमोर मांडले.तसेच याप्रसंगी जासई गावचे शिक्षण प्रेमी तात्या,विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ.मुकादम मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर विद्यालयाच्या प्राचार्या व आजच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. म्हात्रे के जी. मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पर भाषण केले.शेवटी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन इयत्ता दहावीच्या सर्व वर्गांनी मिळून केले होते.



## उरण मधील ओएनजीसीच्या गॅस प्रोसेसिंग प्रकल्पात भिषण स्पोट

# तरीही अधिकारी म्हणतात घाबरून“अल इज” वेल

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील

19 सप्टेंबर2019 रोजी गणेशोत्सवाच्या दुसऱ्यादिवसी पहाटे उरण येथील ओएनजीसीच्या प्रकल्पात भीषण स्पोट होऊन मोठया प्रमाणात आगीचे तांडव झाले होते तरयाच प्रकल्पात 6 वर्षानंतर गणेशोत्सवाच्या सांगते नंतर दोन दिवसानी गॅस प्रोसेसिंग प्रकल्पात सोमवारी दि. 9 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी साडेतीन वाजता पून्हा एकदा भिषण स्पोट होऊन आगीचे तांडव सुरु झाले, यास्पोटा नंतर परिसरात आगीने आपले रोद्ररूप धरण केले.यावेळी झालेल्या भीषण स्फोटाचा आवाज एवढा प्रचंड होता की, संपूर्ण परिसर दणाणून गेला,आजूबाजूच्या गावांतील घरांना हादरे बसले काही ठिकाणी घरांच्या काचा फुटून ग्रमस्थांच्या घरादारांचे मोठया प्रमाणातनुकसान झाले,मात्र हा स्पोट कशामुळे झाला याचे नक्की कारण समजू शकले नाही. तर काहींच्या मते गॅस पाईपलाईन गरम झाल्याने ही दुर्घटनाघडली असल्याची चर्चा ऐकिवात येत आहे,दूरवरूनही काळ्या धूरा व आगीच्या प्रचंड ज्वाळांचे दर्शन घडत असल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण होते. घटनास्थळी ओएनजीसी अग्निशमनदल,सिडको अग्निशमनदलासह इतर 5 असे एकूण सातअग्निशमन दलाच्या सात गाड्या घटनास्थळी त्वरित दाखल झाल्या , अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक परिश्रमानंतर सदरची आग आटोक्यात आणली, सुदैवाने या आगीत कोणती हीप्रकारची जीवितहानी झालेली नाही, मात्र ग्रामस्थांच्या घरांना व मालमत्तेला या स्पोटाचा मोठा फटका बसला आहे.

अर्धशतक पूर्ण करणाऱ्या या उरणातील ओएनजीसीच्या प्रकल्पात आज पर्यंत या अनेक आगी आणि स्पोट होऊन विक्त हानी सोबत जीवितहानी ही झालेली आहे.2004 सालीपावसाळी मोसमाच्या आसपास ओएनजीसी प्रकल्पातून नाफ्तालिकेज झाला. हा नाफ्ता पावसाच्या पाण्यामधून बाहेर पडत असताना या घटनेत अत्यंत ज्वालाग्रही नाफ्ता पेटल्याने या नाल्यावर प्रातःविधीसाठी गेलेले ग्रामस्थ रामचंद्र घरात हे या आगीत होरपळून .मेले मात्र ओएनजीसी कंपनीला याचे कोणतेच सोयर-सुतक नव्हते यानंतरही पिरवाडी समुद्रकिनाऱ्यावर ओएनजीसी प्रकल्पातून क्रुडऑइल,नाफ्ता,वा हतजणे,पाईप,टाक्या लिकेज होणे या सारखे अनेक प्रकार घडले आहेत.अनेक लहान मोठया आगी आणि स्पोटा नंतर 3 सप्टेंबर 2004 रोजी गणपती स्थापनेच्या दुसऱ्या दिवशी पहाटेच्या सुमारास प्रकल्पातएकाच धमाका होऊन एपीयु-3 याक्रमांकाचा प्रकल्पांतीलपूर्ण विभागच आगीच्या भक्ष्यस्थानी सापडला प्रथमदर्शनी कामाला देव मानणारेया विभागाचे जनरल मॅनेजर चाल्ला पिल्ला नरसींहरावयांचा जागीच मृत्यू झाला पाठोपाठ सी.एन. राव धमका झाल्या नंतर आग विझविण्याचा प्रयत्न करणारे प्रकल्पाचे फायर अधिकारी कॅप्टन इराना मुनियाप्पा नायका, एम.के. पासवान, सतीश प्रसाद कुशवाह, या तिघा फायर अधिकाऱ्यांना आपला जीव गमवावा लागला. ग्राम्स्थानाही श्वास घ्ण्यास अडचण होत होती अशा अनेक लहान मोठया आगी या काळात लागून गेल्या.असल्या तरी ओएनजीसीचे अधिकारी म्हणतात ओएनजीसीच्या प्रकल्पात नेहमीच “अल इज वेल-अल इज वेल आणी या लहान मोठया आगीच्या आणि स्पोटाच्या नंतर 8 सप्टेंबर 2025 रोजी पून्हाएकदा धमाका होऊन भिषण स्पोट होऊन आगीचे तांडव सुरु झाले,

घटने नंतर अति दक्षताघेत आग भडकू नये या करिता खबरदारीचा उपाय म्हणून प्रकल्पाच्या बाजूचा परिसर रिकामा करण्यात आला. सुरक्षा कारणास्तव गॅस पुरवठा काहीकाळ बंद ठेवण्यात आला.सात अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होत्या अग्निशमन दलाच्या जवानांनी प्रयत्नाचीशर्थ करून आग आटोक्यात आणली ओएनजीसीच्या अधिकाऱ्यांनीग्रामस्थांना “अल इज वेल-अल इज वेल”इशारादेत घाबरून न जाण्याचे आव्हन केले आहे. आहे.



# नवीन पनवेलमध्ये गौरा गणपती सार्वजनिक उत्सवाचे आयोजन



दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी) नवीन पनवेल येथील अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ आणि प्रियदर्शनी महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक २१ सप्टेंबर रोजी "गौरा गणपती सार्वजनिक उत्सव" आयोजित करण्यात आला आहे. यंदा या उत्सवाचे २१ वे वर्ष आहे.

नवीन पनवेलमधील सेक्टर १७, पीएल ५/२८च्या समोर गणेश मंदिरा जवळ होणाऱ्या या उत्सवात बुधवारी सकाळी १० वाजता श्रींच्या मुर्तीची प्रतिष्ठापना पूजन व आरती, तर रात्री ०८ ते ११ वाजेदरम्यान भजन, सांस्कृतिक कार्यक्रम व महाप्रसाद आयोजित करण्यात आले असून गुरुवारी सायंकाळी ०५ वाजता श्री गणेश मुर्ती विसर्जनाची भव्य मिरवणूक असणार आहे. या उत्सवाचा जास्तीत जास्त भक्तगणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उत्सवाच्या आयोजिका पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका सुशीला जगदिश घरत व पनवेल वैद्यकीय सेलच्या अध्यक्षा डॉ. अस्मिता घरत यांनी केले आहे.

# मा.शिवाली माने देशमुख ठरल्या राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापिका पुरस्काराच्या मानकरी

दैनिक युवक आधार
सणसरः- विकास क्षत्रिय

दैनिक युवक आधार यांच्या मार्फत देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार श्री छत्रपती कला वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या शिवाल माने देशमुख यांना सन्माननीत करण्यात आला सदर पुरस्कार सोहळा 7 सप्टेंबर रोजी पनवेल येथे लोकमतचे विलास बडे साम टीव्हचे निलेश खरे प्रसिद्ध अभिनेत्री माधवी जुवेकर यांच्या हस्ते शगून हॉल येथे देण्यात आला हा पुरस्कार एक कर्तव्यदक्ष आणि प्रत्येक सामाजिक कार्यात एक जबाबदार व्यक्तिमत्व म्हणून ख्याती असलेल्या व्यक्तीनां दिला जातो त्यांनी आपल्या महाविद्यालया मध्ये आपल्या कार्याने एक मानाचे स्थान निर्माण केले आहे एक प्राचार्या म्हणून त्यांनी आपल्या महाविद्यालयात विविध उपक्रम राबवले आणि त्याची अंमलबजावणी ही स्वतः काळजीने करून घेतात यामध्ये परीक्षा




जादा तास सराव टेस्ट एवढेच नाही तर क्रीडा इंग्रजी ग्रामर हिंदी स्पर्धा परीक्षा इन्स्पायर अवार्ड खेळ विभाग क्षेत्रातही त्यांचे योगदान मोठे आहे.आपल्या कार्याने प्रत्येक क्षेत्रात भवानीनगर परिसरात महाविद्यालयाने एक अग्रगण्य स्थान निर्माण केले आहे.या सर्वाचे श्रेय प्राचार्या शिवाली माने देशमुख मॅडम आणि त्यांचा महाविद्यालयाचा सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी स्टाफ यांना दिले जाते.त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी संस्थेच्या अध्यक्ष पृथ्वीराज बापू जाचक उपाध्यक्ष कैलास गावडे,जेष्ठ माजी संचालक मुरलीधर काका निंबाळकर सरपंच यशवंत पाटील व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी स्टाफ सणसर ग्रामस्थच्या वतीने अभिनंदन करून कौतुक करण्यात आले.

# पोषक आहार समस्या केवळ वैद्यकीय समस्या नसून त्या बहूअंगी आहे -प्रा. मनीषा सोळंकी

दैनिक युवक आधार
उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी

दिग्रस -येथील श्रीमती सविताबाई उत्तमराव देशमुख महाविद्यालयात गुह अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने पोषण सप्ताह ४ सप्टेंबर ला साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. मनीषा सोळंके होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.प्रिया इंगोले,डॉ. गोल्डी जांभुळकर व समन्वयक डॉ. प्रीती गावंडे मंचकावर उपस्थित होत्या. प्रथम प्रतिमा पूजन पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले प्रास्ताविकांमध्ये डॉ. प्रिती गावंडे यांनी पोषण आहाराचे महत्व विशद करताना प्रतिपादन केले की,पोषक आहाराच्या सर्व घटका विषयी लोकमध्ये विशेषता माता मध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. प्रा. प्रिया इंगोले यांनी उपलब्ध परिस्थितित उत्तम पोषक आहार, कुपोषण, रक्ताशय असे आजार टाळण्यासाठी विद्यार्थ्यास प्रवृत्त करणे आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. गोल्डी जांभुळकर यांनी कार्यक्रमाचे कौतुक केले व पोषण आहाराची माहिती मिळावी यासाठी अशा कार्यक्रमाची आवश्यकता आहे असे प्रतिपादन केले. तसेच अध्यक्ष प्रा.



मनीषा सोळंकी यांनी पोषक आहार समस्या केवळ वैद्यकीय समस्या नसून त्या बहूअंगी आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे संचालन कु.स्नेहल राठोड तर आभार कु. कवटकर यांनी केले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक कोटूरवार याच्या मार्गदर्शनात गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रिती गावंडे यांनीआयोजित केला. या कार्यक्रम आयोजनाकरिता महाविद्यालयात डॉ. दामोदर दुधे, डॉ. दीपक उलमाले डॉ. अविनाश जाधव, प्रा. अनिस सय्यद, श्री. कोमल राठोड, श्री. राजेश गंगथडे श्री. परमेश्वर राठोड याचे सहकार्य लाभले.

# मलकापुरात गणरायाला भक्तीपूर्ण वातावरणात निरोप

मलकापूरः चरणी ठेवितो माथा, चैन पडेना आमच्या मनाला.. अवध्या दिनाच्या नाथा, गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या अशा भावना व्यक्त करीत ६ सप्टेंबर रोजी गणरायाला अंतकरणाने मलकापूर नगरीमध्ये निरोप देण्यात आला. यावर्षी मलकापूर शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत ६३ सार्वजनिक गणेश मंडळांची स्थापना करण्यात आली होती. त्यामध्ये २१ सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांना विसर्जन मिरवणुकीची परवानगी देण्यात आलेली होती. तब्बल २० दिवसानंतर ११ व्या दिवशी गणरायाला मोठ्या जल्लोषात गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या अशा घोषणांनी गणरायाला निरोप देण्यासाठी मलकापूर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रारंभी सायंकाळी ६ वाजता मानाचा गणपती म्हणून असलेल्या श्री गुरुदेव गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रम प्रसंगी स्थानिक गांधी चौक येथे विसर्जन मिरवणूक प्रसंगी मानाच्या गणपतीला आ. चैनसुख संचेती, उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, तहसीलदार तथा न.प. प्रशासक राहुल तायडे, ठाणेदार गणेश गिरी, समतेचे निळे वादळचे संस्थापक अध्यक्ष अशांतभाई



वानखेडे, माजी आमदार वसंतराव शिंदे, मा. नगराध्यक्ष ॲड. मजीद कुरेशी, श्यामकुमार राठी, हाजी रशिदखाँ जमादार, मेजर नामदेवराव पाटील, रमेशसिंहदादा राजपूत, सु. मा. शिदि, संतोषराव बोबटकार, अमृत बोबटकार दिलीपभाऊ गोळीवाले, शंकरराव पाटील, सभापती संजय काजळे पाटील, मिलींद डवले, मोहन शर्मा, सनाउल्लाखी जमादार, पत्रकार रमेशभाऊ उमाळकर, हरीभाऊ गोसावी, विरसिंहदादा राजपूत, राजेश इंगळे, प्रविण राजपूत, समाधान सुरवाडे, धिरज वैष्णव, संदीप सावजी, अनिल गोठी, शेख जमील शेख जानमोहम्मद, दामोधर शर्मा, गजेंद्रसिंह राजपूत, डी. विजय डागा, युवानेते कपिलकुमार राठी, राजेंद्र कोचर, दिलीप इंगळे, मनिष लखानी, डॉ. योगेश पटणी, मजीद राही, यांचेसह विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच सेवाभावी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मानाच्या गणपतीचे विधीवत पुजन व माल्यार्पण केले. त्यानंतर विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला.

# महामार्गाची दुरुस्ती तत्काळ करा अन्यथा कार्यालयास टाळे ठोकणार

## जागतिक बँकेच्या कार्यकारी अभियंत्यास काँग्रेसचा इशारा

दैनिक युवक आधार
(नेवासा प्रतिनिधीः- लखन वाल्हेकर

अहिल्यानगर - छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्ती कामास तात्काळ सुरुवात करा अन्यथा जागतिक बँकेच्या कार्यालयास टाळे ठोकुण त्यासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचे निवेदन कार्यकारी अभियंता यांना काँग्रेस पक्षाकडून देण्यात आले. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला जोडणा-या प्रमुख महामार्गापैकी असलेला महामार्ग म्हणजे अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर हा महामार्ग या महामार्गाची झालेली अत्यंत दयनीय अवस्था व या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होणारा मनस्ताप हा प्रश्न मोठा कळीचा मुद्दा बनला आहे. महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रवासी हैराण झाल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नागरिकांसह पुणे, अहिल्यानगर, संभाजीनगर या तीन जिल्ह्यातून व्यवसाय, नोकरी, वेगवेगळ्या कामानिमित मोठ्या प्रमाणावर नागरिक या मार्गावरून नेहेमी प्रवास करत असतात तर रांजणगाव एमआयडीसी व संभाजीनगर येथील एमआयडीसी यामुळे कंटेनर व अवजड वाहतूक या मार्गावरून नेहेमी सुरू असते. परंतु गेल्या चार-पाच महिन्यापासून या मार्गाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे या मार्गाची अवस्था मोठी वाईट झाली आहे . ऐन पावसाळ्यात खड्ड्यांमुळे प्रवास जीवघेणा बनला असून अपघाताचे प्रमाण वाढून अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमावावा लागला आहे. खड्ड्यांमुळे वाहनाचे होणारे नुकसान , वाहतूक कोंडी, प्रवासाला लागणारा जास्त कालावधी यामुळे जास्तीच्या इंधनाचा आर्थिक भुर्दंड प्रवाशांना सहन करावा लागत आहे. मागील एक वर्षासाठी खड्डे बुजविण्याचे टेंडर काढण्यात आले होते त्याची मुदत याच सप्टेंबर महिन्यात संपली आहे. परंतु मागील चार महिन्यात ठेकेदाराने एकदाही खड्डे बुजविण्याची तसदी घेतली नाही. तर जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांनी सुद्धा ठेकेदारास पाठीशी घालत शब्द काढला नाही. नागरिकांच्या तक्रारीनंतर काही ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात मुरुमाने खड्डे बुजविली पण माती मिश्रित मुरूमाने खड्डे बुजविल्याने महामार्गावर धुळीचे व चिखलाचे साम्राज्य बघण्यास मिळत आहे. याच चिखलवरून घसरून दुचाकी स्वारांचे अपघात होत आहे. महामार्गालगत गेलेल्या गॅस पाईप लाईनमुळे देखील या मार्गाची अवस्था मोठी वाईट होऊन महामार्ग खचत चालला आहे. खड्ड्याबरोबरच, ठीक ठिकाणी डीवायडर, कोणत्याही प्रकारचे सिग्नल नसणे, यामुळे रोजच चार पाच वाहने मधल्या डीवायडरवर चढलेली दिसून येतात ही नित्य नियमाची बाब बनली आहे. नागरिकांच्या या तक्रारीची दखल घेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी जागतिक बँकेचे कार्यकारी अभियंता यशवंत पाटील यांची भेट घेऊन महामार्गाच्या तत्काळ दुरुस्तीची मागणी केली. यावेळी आठवडाभरात दुरूस्ती कामास सुरुवात केली नाही तर कार्यालयास टाळे ठोकुण त्यासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशाराही दिला. यावेळी दहादिवसाच्या आत कामास



सुरुवात करून दुरुस्ती केली जाईल असे कार्यकारी अभियंता यशवंत पाटील यांनी स्पष्ट केले. निवेदनावेळी नेवासा काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल,छावाचे रावसाहेब काळे, सुमित पटारे, युवा नेते हरीश चक्रनारायण, संदीप मोटे, आदी उपस्थित होते.

*चौकट* - महामार्गावरील अपघातांमुळे अनेक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे यामुळे ठेकेदार व जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्याबरोबरच भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल करावा. या सर्वास जबाबदार जागतिक बँकेचे अधिकारी असून यांच्यावर गुन्हे दाखल झाल्याशिवाय शांत बसणार नाही - संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.